देशोन्नती

# गैरहजर राहणाऱ्या कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा

## ग्राम स्वच्छता अभियानात तपासणीच्या वेळी कर्मचारी होते गैरहजर सिईओ यांची कारवाई

देशोन्नती वृत्तसंकलन...

**वशिम** ■ संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत विभागस्तरीय तपासणी करिता आयुक्त कार्यालयातील पथक कारंजा तालुक्यातील गायवळ या गावात गेले असता संबंधित ग्रामसेवकच गावात उपस्थित नसल्याने कोणत्याही तपासणीविना पथक माघारी फिरले.

या बाबीची गंभीर दखल घेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी गावाच्या ग्रामसेवकासह जि. प. शाळेचे मुख्याध्यापक, ३ शिक्षक आणि गटविकास अधिकारी यांनाही कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश दिले. गायवळ येथील ग्रामसेवक एस. व्ही. राठोड यांच्या दोन वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात थांबवण्याचे तसेच पर्यवेक्षणीय कामात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवून गटविकास अधिकारी प्रफुल्ल तोटेवाड यांच्या सेवा पुस्तीकेत नोंद घेण्याचे निर्देश सिईओ वाघमारे यांनी दिले.

जिल्हा परिषदेचे सुत्रे हाती घेतल्यानंतर मुख्य कार्यकारी वाघमारे यांची ही पहीलीच कार्यवाही असुन यामुळे कामात हलगर्जीपणा करणाऱ्या कर्मचार्यांच्या मनात धडकी भरली आहे.

संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक पटकावलेल्या कारंजा येथील गायवळ आणि प्रथम क्रमांक पटकावलेल्या मालेगाव तालुक्यातील ढोरखेडा गावाची तपासणी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या पथकामार्फत करण्यात येत होती.

त्यानुसार सकाळी नऊ वाजता अमरावती विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास) राजेंद्र फडके हे आपल्या पथकासह गायवळ या गावाची तपासणी करण्याकरता गावात गेले असता गावातील ग्रामसेवक इतर संबंधित कर्मचारी गैरहजर आढळून आले. गावातील शाळा व अंगणवाडी सुद्धा बंद असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले.

या सर्व प्रक्रियेचा मुख्य भाग असलेला ग्रामसेवकच गावात हजर नसल्याने गावाची तपासणी न करता तपासणी पथकाला परत यावे लागले. गटविकास अधिकारी तोटेवाड हे सुद्धा गावात उशिरा पोहोचल्याने उपायुक्त फडके यांनी नाराजी व्यक्त केली. यावेळी विभागीय आयुक्तांच्या पथकासोबत जिल्हा परिषदेच्या जल जीवन मिशनचे संचालक जगदीश साहू व त्यांची जिल्हा टीम उपस्थित होती.

या सर्व प्रक्रियेचा मुख्य भाग असलेला ग्रामसेवकच गावात हजर नसल्याने गावाची तपासणी न करता तपासणी पथकाला परत यावे लागले. गटविकास अधिकारी तोटेवाड हे सुद्धा गावात उशिरा पोहोचल्याने उपायुक्त फडके यांनी नाराजी व्यक्त केली. यावेळी विभागीय आयुक्तांच्या पथकासोबत जिल्हा परिषदेच्या जल जीवन मिशनचे संचालक जगदीश साहू व त्यांची जिल्हा टीम उपस्थित होती.

नंतर या पथकाने मालेगाव तालुक्यातील ढोरखेडा या गावाची तपासणी केली.

स्वच्छता अभियानाच्या तपासणी दरम्यान गायवळ येथील जिल्हा परिषद शाळा बंद असल्यामुळे तसेच शाळेत एकही शिक्षक उपस्थित नसल्यामुळे शाळेचे मुख्याध्यापक भारत येवले, शिक्षक श्रीकांत सावके, शंकर धनगर, दिनेश गाडगे यांनाही कर्तव्यात कसुर केल्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले. गायवळ येथील अंगणवाडी सेविका पदमा हरिहर जगताप व मदतनीस मंगला आनंदा इंगळे यांना नोटीस बजावण्याचे व दोषी आढळल्यास कारवाई करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दिले.

या कारवाईमुळे कर्तव्यात कामचुकार काम करणाऱ्या कर्मचाऱ्यामध्ये धांदल उडाल्याचे दिसून येत आहे.( जि.प्र)

पुण्य नगरी

# विभागीय तपासणीस गैरहजर राहणाऱ्यांना 'शो-कॉज'

## शिक्षक, मुख्याध्यापक व बीडीओंचा समावेश; सीईओ वाघमारे ॲक्शन मोडवर

वाशीम, दि. २२ (प्रतिनिधी)

**विभागीय आयुक्त कार्यालयाचे पथक संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत तपासणी करीता आले असता गैरहजर राहणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्या सोबतच दोन ग्रामसेवकांची वेतनवाढ रोखण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दिले. नव्याने रूजू झालेले सीईओ वाघमारे ॲक्शन मोडवर येताच अंगणवाडी सेविका, शिक्षक, मुख्याध्यापक, ग्रामसेवकांसह गटविकास अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. त्यामुळे यापुढे अधिकारी, कर्मचाऱ्यांना शिस्त लागून प्रशासकीय कामात पारदर्शकता येईल अशी अपेक्षा व्यक्त केल्या जात आहे.**

सुत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानांतर्गत जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक पटकावलेल्या कारंजा येथील गायवळ आणि प्रथम क्रमांक पटकावलेल्या मालेगाव तालुक्यातील ढोरखेडा गावाची तपासणी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या पथकामार्फत करण्यात येत होती. त्यानुसार विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त (विकास) राजेंद्र फडके हे आपल्या पथकासह गायवळ या गावाची तपासणी करण्याकरता गावात दाखल झाले. यावेळी संबंधित ग्रामसेवकच गावात उपस्थित नसल्याने कोणत्याही तपासणीविना पथक माघारी फिरले. दरम्यान, गावातील शाळा व अंगणवाडी सुद्धा बंद असल्याचे पथकाच्या निदर्शनास आले. या सर्व प्रक्रियेचा मुख्य भाग असलेला ग्रामसेवकच गावात हजर नसल्याने गावाची तपासणी न करता तपासणी पथकाला परत यावे लागले. गटविकास अधिकारी तोटेवाड हे सुद्धा गावात उशिरा पोहोचल्याने उपायुक्त फडके यांनी नाराजी व्यक्त केली. यावेळी विभागीय आयुक्तांच्या पथकासोबत जिल्हा परिषदेच्या जल जीवन मिशनचे संचालक जगदीश साहू व त्यांची जिल्हा टीम उपस्थित होती. नंतर या पथकाने मालेगाव तालुक्यातील ढोरखेडा या गावाची तपासणी केली. या सर्व प्रकाराची गंभीर दखल घेत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी गावाच्या ग्रामसेवकासह जि. प. शाळेचे मुख्याध्यापक, ३ शिक्षक आणि गटविकास अधिकारी यांनाही कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश दिले. गायवळ येथील ग्रामसेवक एस. व्ही. राठोड यांच्या दोन वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात थांबवण्याचे तसेच पर्यवेक्षणीय कामात हलगर्जीपणा केल्याचा ठपका ठेवून गटविकास अधिकारी प्रफुल्ल तोटेवाड यांच्या सेवा पुस्तकेत नोंद घेण्याचे निर्देश सिईओ वाघमारे यांनी दिले.जिल्हा परिषदेची सुत्रे हाती घेतल्यानंतर मुख्य कार्यकारी वाघमारे यांची ही पहीलीच कार्यवाही असुन यामुळे कामात हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांमध्ये धडकी भरली आहे.

### चार शिक्षकांना कारणे दाखवा

स्वच्छता अभियानाच्या तपासणी दरम्यान गायवळ येथील जिल्हा परिषद शाळा बंद असल्यामुळे तसेच शाळेत एकही शिक्षक उपस्थित नसल्यामुळे शाळेचे मुख्याध्यापक भारत येवले, शिक्षक श्रीकांत सावके, शंकर धनगर, दिनेश गाडगे यांनाही कर्तव्यात कसुर केल्याबाबत कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे निर्देश देण्यात आले. तर अंगणवाडी सेविका पदमा हरिहर जगताप व मदतनीस मंगला आनंदा इंगळे यांना नोटीस बजावण्याचे व दोषी आढळल्यास कारवाई करण्याचे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी वैभव वाघमारे यांनी दिले.

Smart Washim Edition
Feb 23, 2024 Page No. 1
Powered by : eReleGo.com